# मिरा भाईंदर महानगरपालिका

**स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प.), ता.जि. ठाणे, 401 101.**
**दुरध्वनी क्र. 28192828/28193087.**


**जा.क्र.मनपा/आस्था/** 854 **/2022-23** **दि.** 15/07 **/2022**

प्रति,
सिस्टीम मॅनेजर,
संगणक विभाग,
मिरा भाईंदर महानगरपालिका.

विषय :- महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर जाहिर सुचना प्रसिध्द करणेबाबत.
संदर्भ :- जा.क्र.मनपा/आस्था/854/2022-23, दि.15/07/2022 रोजीची जाहिर सुचना.

मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या शिक्षण विभागातील सेमी इंग्रजी माध्यमांच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी तात्पुरत्या स्वरुपात मानधन तत्वावर शिक्षकांची पदे भरण्यासाठी इच्छुक व पात्र उमेदवारांकडुन अर्ज मागविण्यात आलेले आहे.

सदरची जाहिर सुचना महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात यावी.

(सुनिल यादव)
सहा.आयुक्त (सा.प्र.)
मिरा भाईंदर महानगरपालिका

सोबत- जाहिर सुचनेची प्रत

# मिरा भाईंदर महानगरपालिका

स्व इंदिरा गांधी भवन, मुख्य कार्यालय, छत्रपती शिवाजी
महाराज मार्ग, भाईंदर (प.) ता. जि. ठाणे 40101.
दुरध्वनी क्र. 022-28192828/28193087.


स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव

जा.क्र.मनपा/आस्था/ 854 /2022-23 दि. 15/07/2022

## सेमी इंग्रजी माध्यम, ठोक मानधनावर तात्पुरत्या स्वरुपात शिक्षक उपलब्ध करुन घेणेबाबत.

### ।।जाहीर सूचना।।

आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका शिक्षण विभागासाठी संचलित सेमी इंग्रजी माध्यमाच्या प्राथमिक व माध्यमिक शाळांसाठी सन 2022-23 करीता तात्पुरत्या स्वरुपात केवळ मानधन तत्वावर 10 महिन्याच्या कालावधीकरीता शिक्षक करार पध्दतीने भरावयाचे असल्याने पात्र व इच्छुक उमेदवारांकडून अर्ज मागवित आहे.

महानगरपालिकेच्या शाळांसाठी सेमी इंग्रजी करीता प्राथमिक शिक्षकांना दरमहा ठोक मानधन रक्कम रु.15,000/- (अक्षरी रु.पंधरा हजार मात्र) व इयत्ता 9 वी व 10 वी करीता माध्यमिक शिक्षकांना दरमहा ठोक मानधन रक्कम रु.20,000/- (अक्षरी रु.वीस हजार मात्र) यावर करार पध्दतीवरील सेमी इंग्रजी प्राथमिक व माध्यमिक शिक्षक या पदाकरीता शैक्षणिक व व्यावसायिक पात्रतेच्या प्राप्त गुणानुक्रमे निवड करण्यात येणार आहे.

शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता पूर्ण करणाऱ्या इच्छुक व पात्र उमेदवारांचे दि. 29/07/2022 रोजी सायं 04.00 वाजेपर्यंत आस्थापना विभाग, मिरा भाईंदर महानगरपालिका, मुख्य कार्यालय, तिसरा मजला, स्व.इंदिरा गांधी भवन, छत्रपती शिवाजी महाराज मार्ग, भाईंदर (प) येथे अर्ज स्वहस्ते स्विकारण्यात येतील. पोस्टाने/टपालाने अर्ज स्विकारले जाणार नाहीत. तसेच पोस्टाने/टपालाने अर्ज प्राप्त झाल्यास अशा अर्जांचा विचार केला जाणार नाही.

- शैक्षणिक व व्यावसायिक अर्हता प्राधान्यक्रमाने खालीलप्रमाणे निश्चित केली आहे.
  1) सेमी इंग्रजीकरीता शिक्षक (प्राथमिक) या पदासाठी 12 वी Science व D.ed किंवा B.sc व B.ed उत्तीर्ण असणे आवश्यक.
  2) इयत्ता 9 वी ते 10 वी करीता शिक्षक (माध्यमिक) या पदासाठी B.sc व B.ed उत्तीर्ण असणे आवश्यक.
  3) वर नमूद उल्लेखित सर्व उमेदवारांना शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/सीईटी) उत्तीर्ण असणे बंधनकारक राहील. टीईटी/सीईटी उत्तीर्ण नसलेल्या उमेदवारांचे अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

- शिक्षक (प्राथमिक) - 36 पदे (मानधन रु.15,000/- सर्व भत्त्यांसह)

| अ. क्र. | पदाचे नाव | अ.जा | अ.ज. | वि.जा .(अ) | भ.ज.(ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | ई डब्लु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | शिक्षक (प्राथमिक) | 05 | 02 | 01 | 01 | 01 | 01 | 01 | 07 | 03 | 14 | 36 |

- शिक्षक (माध्यमिक) - 08 पदे (मानधन रु.20,000/- सर्व भत्त्यांसह)

| अ. क्र | पदाचे नाव | अ.जा | अ.ज. | वि.जा .(अ) | भ.ज.(ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | वि.मा.प्र | इ.मा.व | ई डब्लु एस | खुला | एकुण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 1. | शिक्षक (माध्यमिक) | 01 | 01 | 01 | - | - | - | - | 01 | 01 | 03 | 08 |

1. **वयोमर्यादा -**

1.3 **शिक्षक (प्राथमिक/माध्यमिक)** पदासाठी वयोमर्यादा किमान १८ वर्षे पूर्ण व कमाल ३८ वर्षे असून, अर्जदार/उमेदवार मागासवर्गीय असल्यास वयोमर्यादा ही ४३ वर्षे राहील.

1.4 अर्जदार/उमेदवाराचे वयासाठी जाहीरात प्रसिध्दीच्या दिवशीचे वय विचारात घेतले जाईल.

2. **उमेदवार निवडण्याची पध्दत -**

2.1 अर्ज सादर करतेवेळी अर्जदाराने खालीलप्रमाणे प्रमाणपत्रांच्या छायांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

अ) शाळा सोडल्याचा दाखला.

ब) जातीचे प्रमाण पत्र, जात पडताळणी प्रमाणपत्र (मागासवर्गीय असल्यास)

क) वैधता प्रमाणपत्र/नॉन क्रिमिलिअर प्रमाणपत्र (मागासवर्गीय उमेदवारासाठी)

ड) 12 वी Science उत्तीर्ण प्रमाणपत्र व D.ed पदवी प्रमाणपत्र (प्राथमिक शिक्षकांसाठी)

इ) Bsc. पदवी उत्तीर्ण प्रमाणपत्र व B.ed उत्तीर्ण प्रमाणपत्र (माध्यमिक शिक्षकांसाठी)

ई) शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी/सीईटी) उत्तीर्ण प्रमाणपत्र

उ) अनुभवाचे प्रमाणपत्र

ऊ) जन्म दाखला/डोमिसाईल प्रमाणपत्र (महाराष्ट्रात वास्तव्य)

उमेदवार अपंग असल्यास अपंगत्वाचे प्रमाण किमान ४०% असणे आवश्यक आहे. उमेदवाराने अपंगत्वाचे संबंधित जिल्ह्यातील शासकीय रुग्णालयातील प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय तज्ज्ञाने/शासकीय सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेल्या प्रमाणपत्राची साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

2.2 महानगरपालिकेच्या संकेतस्थळावर उपलब्ध असलेल्या विहित नमुना अर्जातच उमेदवाराने शिक्षक (प्राथमिक/माध्यमिक) पदासाठी अर्ज सादर करणे आवश्यक राहील. अर्ज विहित नमुन्यात न भरल्यास उमेदवारांच्या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

2.3 शिक्षक(प्राथमिक/माध्यमिक) पदासाठी मराठी भाषेचे ज्ञान असणे आवश्यक आहे.

2.4 मुलाखतीसाठी येण्या-जाण्याचा कोणताही खर्च दिला जाणार नाही.

2.5 फक्त याच जाहिरातीला अनुसरून प्राप्त झालेल्या उमेदवारांचे अर्ज विचारात घेतले जातील. महानगरपालिकेकडे यापूर्वी केलेल्या अर्जाचा विचार केला जाणार नाही. तसेच इतर राज्यातून महाराष्ट्र राज्यात स्थलांतरीत झालेल्या मागासवर्गीय उमेदवारांचे अर्ज विचारांत घेतले जाणार नाहीत.

2.6 उमेदवारास एकापेक्षा अधिक पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास, पदनिहाय स्वतंत्र अर्ज वैयक्तिक माहितीसह (Bio-Data) व त्यासोबत शैक्षणिक पात्रता व इतर नमूद कागदपत्रे विहीत नमुन्यात जोडून सादर करणे आवश्यक आहे. विहीत नमुन्यात नसलेले/अपूर्ण अर्ज स्विकारले जाणार नाहीत.

2.7 उमेदवारांनी स्वतः निश्चित करावयाचे आहे की, ते आवेदित पदांच्या सर्व अर्हता व अटी पूर्ण करतात. उमेदवार विहित अर्हता व अटी पूर्ण करीत नसल्याचे कोणत्याही टप्प्यावर निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्द करण्यात येईल. नेमणूक झाली असल्यास सेवेतून कमी करण्यात येईल व याबाबत कोणताही पत्रव्यवहार विचारात घेतला जाणार नाही.

2.8 शासन निर्णय क्र. रिपभ/प्र.क्र.६६/२०११/ई-१० दि. २७ जून २०११ नुसार (I) परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) उपलब्ध नसल्यास त्यांनी त्यांचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याचा जन्म दाखला (Birth Certificate) सादर करणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत अधिवास प्रमाणपत्राची अट लागू राहणार नाही.

(II) सदर परिक्षार्थीकडे अधिवास प्रमाणपत्र तसेच जन्म तारखेचा दाखला उपलब्ध नसल्यास, त्या परिक्षार्थीने आपला शाळा सोडल्याचा दाखला सादर करणे आवश्यक राहील. परंतु सदर

शाळा सोडल्याच्या दाखल्यामध्ये त्या परिक्षार्थीचा जन्म महाराष्ट्र राज्यात झाला असल्याची नोंद असणे आवश्यक आहे. अशा प्रकरणांत देखील अधिवास प्रमाणपत्राची आवश्यकता असणार नाही.

(III) उपरोक्त बाबी फक्त महाराष्ट्र राज्यात जन्म झालेल्या परिक्षार्थीसाठी लागू राहतील. इतर परिक्षार्थी/उमेदवारांसाठी अधिवास प्रमाणपत्र (Domicile Certificate) आवश्यक राहील.

2.9 आरक्षित मागास प्रवर्गाचा दावा करणाऱ्या उमेदवारांना त्या संदर्भातील सक्षम अधिकाऱ्याने दिलेले जात प्रमाणपत्र (Cast Certificate) व उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्राची (Cast Validity Certificate) साक्षांकित प्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

2.10 जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास, शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्र. बीसीसी-२०११/प्र.क्र.-१०६४/२०११/१६-ब, दि. १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार याचिका क्र. २१३६/ २०११ व अन्य याचिकांवर मा. मुंबई उच्च न्यायालयाच्या औरंगाबाद खंडपीठाने दि. २५/०८/२०११ रोजी दिलेल्या आदेशाच्या विरोधात मा. सर्वोच्च न्यायालय, नवी दिल्ली येथे दाखल केलेल्या एसएलपी मधील आदेशाच्या अधिन राहून, तात्पुरती नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासून ६ महिन्यांचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य आहे, अथवा त्यांची नियुक्ती पूर्वलक्षी प्रभावाने रद्द करणेत येईल.

2.11 एखाद्या अर्जदाराने त्याची निवड करणेसाठी निवड समिती वरील अध्यक्ष, सदस्य तसेच अधिकाऱ्यांवर प्रत्यक्ष/अप्रत्यक्ष, राजकीय अथवा अन्य प्रकाराने दबाब आणल्यास अथवा गैर प्रकाराचा अवलंब केल्यास, त्यास निवड प्रक्रियेतून अपात्र ठरविणेत येईल.

2.12 सामान्य प्रशासन विभाग यांचेकडील पत्र क्रमांक पअंक-१०१०/७१७/प्र.क्र.३२२/१०/१६अ, दि.२६ ऑगस्ट २०१० पत्रान्वये एकदा नोकरी मिळाल्यानंतर पुन्हा दुसऱ्या पदावर नोकरी मिळविण्यासाठी त्या समांतर आरक्षणाचा लाभ देणे हे शासन धोरणाशी विसंगत आहे. एकदा उमेदवाराने समांतर आरक्षणाचा लाभ घेतला असल्यास त्या उमेदवारांस पुन्हा समांतर आरक्षणाचा लाभ देता येणार नाही.

2.13 सामान्य प्रशासन विभाग शासन अधिसूचना क्र. एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०१०/१२, दि.२८/०३/२००५ व शासन परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-२०००/प्र.क्र.१७/२०००/१२, दि.०१/०७/२००५ तसेच महाराष्ट्र नागरी सेवा (लहान मुलांचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ अन्वये दि.२८/०३/२००५ नुसार हयात असलेली व त्यानंतर जन्माला आलेल्या अपत्यांच्या संख्येबाबत लहान कुटुंब असल्याचे प्रतिज्ञापत्र सोबतच्या नमुन्यात अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. तसेच अविवाहित असणाऱ्या अर्जदारांनीही विहित नमुन्यातील प्रतिज्ञापत्रात अविवाहित असे लिहून अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

2.14 अर्जासोबत शैक्षणिक अर्हता, वय, अनुभव, अधिवास दाखला (Domicile Certificate) तसेच जातीचा दाखला, उपलब्ध असल्यास जात वैधता प्रमाणपत्र अ.ज./अ.जा. उमेदवार/अर्जदार वगळून इतरांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसलेबाबत (Non-Creamy-Layer Certificate) प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे. साक्षांकित प्रती केंद्र/राज्य शासनाचे राजपत्रित अधिकारी, पोस्ट मास्तर, मुख्याध्यापक व याबाबत प्राधिकृत व सक्षम अधिकाऱ्यांनीच केलेले असावे **किंवा** Self Attested करून **अर्ज सादर करावे तसे न केल्यास व चुकीची माहिती असल्यास अर्ज अपूर्ण समजून नाकारला जाईल**

2.15 शासनाचे महिला व बालविकास विभागाकडील निर्णय क्र. ८२/२००१/मसेआ-२०००/ प्र.क्र.४१५/का.२, दि.२५/०५/२००१ अन्वये खुला, वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील महिला उमेदवारांना राखीव पदांसाठी अर्ज करावयाचा असल्यास त्यांनी मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

2.16 वि.जा.अ., भ.ज.ब., भ.ज.क., भ.ज.ड., वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारांना सक्षम अधिकाऱ्याचे जात व मुदत संपुष्टात न आलेले वैध नॉन क्रिमीलेअर प्रमाणपत्राची सत्यप्रत अर्जासोबत जोडणे आवश्यक आहे.

2.17 निवड प्रक्रिया सुरु झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने दिलेली माहिती/अगर

कागदपत्रे खोटी सादर केल्याचे किंवा खरी माहिती दडवून ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्या उमेदवारांची निवड/नियुक्ती तात्काळ रद्द करण्यात येईल./शासकीय सेवेत असल्यास बडतर्फ करण्यात येईल.

2.18 एकाच स्थानासाठी (Position) दोन किंवा अधिक उमेदवारांना समान गुण मिळाल्यास सामान्य प्रशासन विभाग यांजकडील शासन निर्णय क्र. प्रानिमं-२००७/प्र.क्र.४६/०७/१३-अ, दि.२७/०६/२००८ मधील निर्णयामध्ये नमूद केल्यानुसार प्राधान्यक्रमाच्या आधारे उमेदवारांची अंतिम निवड केली जाईल.

2.19 अंतरिम निवड यादीमधील पात्र उमेदवारांनी अर्जासोबत सादर केलेल्या विविध प्रमाणपत्रांच्या साक्षांकित प्रती मूळ प्रमाणपत्रांच्या आधारे कागदपत्रे तपासणीच्या वेळी तपासण्यात येतील. सदर प्रमाणपत्रांच्या मूळ प्रती (Original Copy) कागदपत्रे तपासणीच्या वेळी उपलब्ध करुन देणे उमेदवारांवर बंधनकारक राहील. त्यामधील प्रमाणपत्रे खोटी किंवा चुकीची आढळल्यास संबंधित उमेदवार अपात्र ठरविण्यात येईल.

2.20 निवड झालेल्या उमेदवाराची शैक्षणिक पात्रतेची मूळ प्रमाणपत्रे संबंधित मंडळ/ विद्यापीठ/संस्था यांचे जवळ पाठवून सत्यता पडताळणी करण्यात येईल. त्यात खोटी आढळल्यास संबंधिताना नोकरीतून कमी करुन फौजदारी गुन्हा दाखल करण्यात येईल.

2.21 निवड प्रक्रिया सुरू झाल्यानंतर किंवा नियुक्तीनंतर कोणत्याही क्षणी उमेदवाराने चुकीची माहिती/ प्रमाणपत्रे/कागदपत्रे सादर केल्याचे किंवा कोणतीही माहिती दडवुन ठेवल्याचे निदर्शनास आल्यास त्याची उमेदवारी रद्दबातल करण्यात येईल. तसेच नियुक्ती झाली असल्यास कोणतीही पूर्व सूचना न देता नियुक्ती समाप्त करण्यात येईल.

2.22 निवड झालेल्या उमेदवाराविरुध्द पोलीस स्टेशन मध्ये फौजदारी गुन्हा नोंदविला असेल तर त्याला त्याचे स्पष्टीकरण देणे अनिवार्य राहील, स्पष्टीकरण समाधानकारक नसल्यास उमेदावराची निवड रद्द करण्यात येईल.

2.23 जाहिरातीमधील नमूद पदसंख्या कमी अथवा अधिक करण्याचे तसेच कोणतीही भरती पदे रद्द करण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांनी राखून ठेवले आहेत. पद संख्येच्या व आरक्षणाच्या बदलाबाबत अवगत करण्यात येईल.

2.24 प्रशासकीय किंवा अन्य कारणास्तव भरती प्रक्रिया कोणत्याही वेळेस, कोणत्याही टप्प्यावर थांबविण्याचे अधिकार आयुक्त, मिरा भाईंदर महानगरपालिका यांना आहेत.

2.25 **करारपध्दतीने नियुक्ती देण्यात आल्यामुळे संबंधीतास शासनाच्या काणेत्याही संवर्गात/मनपामध्ये सेवा समावेशनाबाबत/सामावून घेण्याबाबतचा अधिकार/हक्क नसेल.**

2.26 **कंत्राटी पध्दतीवरील शिक्षक (प्राथमिक/माध्यमिक) या पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांना कायम नियुक्तीबाबत मा.न्यायालयात दावा करता येणार नाही.**

### 3. भरती प्रक्रिया गुणांकन पध्दत :- 100 गुण त्याचे विभाजन खालीलप्रमाणे -

| अ.क्र. | पदाचे नाव | गुणांकनाची पध्दत |
|---|---|---|
| 1. | शिक्षक (प्राथमिक) | 1. D.ed पदवीकेस मिळालेल्या Agreegate Weightage गुणांनुसार 80 पैकी<br>2. Subject Knowledge (Oral) 07 पैकी<br>3. अनुभव 10 पैकी (एक वर्षाकरीता - 02 गुण याप्रमाणे पुढील गुण देण्यात येतील)<br>4. अतिरिक्त शैक्षणिक अर्हता- 1. पदवी 01 गुण<br>2. पदव्युत्तर पदवी 02 गुण |

| | | |
|---|---|---|
| 2. | शिक्षक (माध्यमिक) | 1. B.ed पदवीस मिळालेल्या Agreegate Weightage गुणांनुसार 80 पैकी<br>2. Subject Knowledge (Oral) 08 पैकी<br>3. अनुभव 10 पैकी (एक वर्षाकरीता - 02 गुण याप्रमाणे पुढील गुण देण्यात येतील)<br>4. अतिरिक्त शैक्षणिक अर्हता- पदव्युत्तर पदवी 02 गुण |

**4. विशेष सूचना :-**

4.1 मध्यस्थ/टक/महानगरपालिकेत संबंध असल्याचे भासविणाऱ्या व्यक्ती यांच्या गैर मार्गाने नोकरी मिळवून देण्याच्या आश्वासनापासून सावध रहावे. त्यातून फसवणूक झाल्यास महानगरपालिका जबाबदार राहणार नाही.

4.2 सदर जाहिरात मिरा भाईंदर महानगरपालिकेच्या http://www.mbmc.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

4.3 सदर भरती प्रक्रियेतील निवड झालेल्या उमेदवारांचे कागदपत्रांव्यतिरिक्त उर्वरित सर्व कागदपत्रे फक्त एक महिन्या पर्यंत महानगरपालिकेकडे उपलब्ध राहतील.

(मा.आयुक्त महोदय यांचे मान्यतेने)

(मारुती गायकवाड)
उप-आयुक्त (मुख्यालय)
मिरा भाईंदर महानगरपालिका

# अर्जाचा नमुना

(पदाचे नांव :- ……………………………… पदांचा सांकेतिक क्र. …………………………… )

प्रति,
मा.आयुक्त सो.
मिरा भाईंदर महानगरपालिका
स्व. इंदिरा गांधी भवन, भाईंदर (प.)
ता. जि. ठाणे. :- ४०१ १०१.

(१) संपुर्ण नांव : मराठी इंग्रजी (कॅपिटल लेटर)

१. आडनांव : ……………………………… ………………………………

२. स्वतःचे नांव : ……………………………… ………………………………

३. वडिलांचे/ पतीचे नांव : ……………………………… ………………………………

(२) पत्रव्यवहाराचा संपुर्ण पत्ता (पिन कोडसहित) : ………………………………………………………………

………………………………………………………………

………………………………………………………………

………………………………………………………………

संपर्कासाठी दुरध्वनी क्रमांक : ………………………………………………………………

(३) अ) जन्मतारीख : तारीख महिना वर्ष

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | |

ब) दिनांक रोजीचे वय ……………………वर्ष……………………महिने…………दिवस

(४) राष्ट्रीयत्व : भारतीय / अभारतीय

(५) अर्जदार महाराष्ट्राचा मुळ रहिवासी आहे काय ? : होय/नाही

(६) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी लागू असलेल्या चौकटीमध्ये ✓ अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | ई डब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(७) जाहिरातीमध्ये नमुद केलेल्या संवर्गासाठी उमेदवाराचा स्वतःचा प्रवर्ग खालीलप्रमाणे लागू असलेल्या चौकटीमध्ये ✓ अशी खुण करावी.

| अ.जा. | अ.ज. | वि.जा. (अ) | भ.ज. (ब) | भ.ज. (क) | भ.ज. (ड) | इ.मा.व. | वि.मा.प्र. | ई डब्ल्यु एस | खुला |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | | | | |

(८) शैक्षणिक अर्हता:

| अ.क्र. | उत्तीर्ण केलेली परीक्षा | मंडळ/विद्यापीठाचे नाव | परीक्षा प्राप्त गुण | टक्केवारी |
|---|---|---|---|---|
| १. | | | | |
| २. | | | | |
| ३. | | | | |
| ४. | | | | |

(९) अनुभव:

| संस्थेचे नाव व पत्ता | कालावधी | | एकुण वर्ष | सेवा सोडण्याचे कारण |
|---|---|---|---|---|
| | पासुन | पर्यंत | | |
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

(१०) अवगत असणाऱ्या भाषा (योग्य ठिकाणी (✓) अशी खुण करावी.)

| मराठी | हिंदी | इंग्रजी | अन्य |
|---|---|---|---|
| | | | |

(११) आपणाविरुध्द न्यायप्रविष्ट प्रकरण, फौजदारी, शिस्तभंगाविषयक प्रकरण वा तत्सम इत्यादी कारवाई चालु आहे काय ?

| होय | नाही |
|---|---|
| | |

(१२) अर्जासोबत खालील (छायांकित) सत्यप्रती जोडलेल्या आहेत.

१) .......................... २) ....................................... ३) .......................................

४) .......................... ५) ....................................... ६) .......................................

मी असे प्रमाणित करतो/करते की, वर नमुद केलेली माहिती खरी असुन, ती खोटी आढळल्यास माझी उमेदवारी नियुक्तीच्या कोणत्याही टप्प्यावर रद्द करण्यात येईल आणि माझे विरुध्द कायदेशीर कारवाई होईल याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/-

ठिकाण :-

दिनांक :-

महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबांचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील
प्रतिज्ञापनाचा
नमुना-अ

प्रतिज्ञापत्र
नमुना-अ
(नियम ४ पाहा)

मी श्री./श्रीमती............................................... श्री............................................... यांचा/ यांची/ मुलगा/ मुलगी/ पत्नी, वय............. वर्षे, राहणार............................................................ याद्वारे पुढीलप्रमाणे असे जाहीर करतो/करते की,

१) मी............................................................ या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला............. इतकी हयात मुले आहेत, त्यापैकी २८ मार्च, २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या......आहे. (असल्यास जन्म दिनांक नमुद करावा)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च, २००६ व तद्नंतर जन्माला आलेल्या, मुलामुळे या पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल, याची मला जाणीव आहे.

अर्जदाराची सही/-

ठिकाण :-

दिनांक :-